महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/४१

# वृत्तपत्र निवेदन

## महानिर्मितीतर्फे कारागीर (क) पदांसाठी व्यवसाय चाचणीचे (ट्रेड टेस्ट) आयोजन

महानिर्मिती कंपनीच्या जाहिरात क्र. ५/२००९ अन्वये जाहीर केलेल्या **कारागीर (क)** पदाच्या निवडीकरिता **व्यवसाय चाचणी (Trade Test)** संबंधीत औद्योगिक संस्थेत दि. ५, ६, ७, व ८ जानेवारी २०१० घेण्यात येणार आहे.

या पदासाठी पाचारण करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांनी व्यवसाय चांचणीस उपस्थित राहण्याबाबतचे पत्र उमेदवारांना कंपनीतर्फे पोष्टाद्वारे पाठविण्यात आलेले आहे. तसेच, त्यांनी कोणत्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आणि कोणत्या दिनांकास व्यवसाय चांचणीसाठी उपस्थित राहावयाचे आहे याबाबतचा सविस्तर तपशील कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahagenco.in) उपलब्ध करण्यात आला आहे. तथापि, ज्या पात्र उमेदवारांना अद्याप प्रवेश पत्र मिळाले नाही अशा उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील संबंधित उपलब्ध माहितीची प्रत घेऊन त्या-त्या परीक्षा केंद्राशी संपर्क साधावा. परिक्षेच्या दिवशी अशा पात्र उमेदवारांना प्रवेशपत्राची नक्कल प्रत देण्याची व्यवस्था महानिर्मितीतर्फे करण्यात आलेली आहे.

सदर संकेत स्थळावर उमेदवारांनी दिनांक २०.०९.२००९ ला झालेल्या लेखी परिक्षेचा १० अंकी परीक्षा क्रमांक भरावा त्यानुसार व्यवसाय चांचणीची सविस्तर माहिती संकेत स्थळावर दिसेल.

संबधितांनी त्यांना निर्देशित केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे, असे महानिर्मितीतर्फे कळविण्यात येत आहे.

---

दिनांक : ०१/०१/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**